# राष्ट्रीय आरोग्य अभियान, १५ वा वित्त आयोग व राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान

जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, नागपूर

कंत्राटी तत्वावर पदभरतीकरीता जाहीरात

सन २०२५-२६

राष्ट्रीय आरोग्य अभियान, १५ वा वित्त आयोग अंतर्गत **BPHU** व राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, नागपूर करीता कंत्राटी तत्वावर विविध रिक्त पदांकरीता जाहीरात **www.nhm.zpnagpur.in** व **www.zpnagpur.maharashtra.gov.in** या अधिकृत संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात आलेली आहे.

तरी सर्व पात्र उमेदवारांनी संबंधित पदांकरीता वरील संकेतस्थळावर जावून आपला अर्ज **Online** पध्दतीने भरावा. तसेच यानंतर **www.nagpurzp.com** या संकेतस्थळावर कोणतीही जाहीरात, सुचना व जाहीरातीसंबंधित कोणतीही माहिती प्रकाशित केल्या जाणार नाही याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

तसेच यापुढे **NHM, NUHM, BPHU, UHWC** व **HBT** अंतर्गत प्रकाशित होणाऱ्या संपूर्ण जाहीराती व जाहीराती संबंधित सर्व माहिती/वारंवार प्रकाशित होणाऱ्या सुचना/ यादया **www.nhm.zpnagpur.in** व **www.zpnagpur.maharashtra.gov.in** याच संकेतस्थळावर प्रकाशित केल्या जातील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आदेशान्वये

जिल्हा आरोग्य अधिकारी

जिल्हा परिषद, नागपूर

# राष्ट्रीय आरोग्य अभियान, १५ वा वित्त आयोग व
# राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान

NHM
राष्ट्रीय आरोग्य अभियान
महाराष्ट्र

## जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, नागपूर
## कंत्राटी तत्वावर पदभरतीकरीता जाहीरात
## सन २०२५-२६

राष्ट्रीय आरोग्य अभियान, १५ वा वित्त आयोग अंतर्गत BPHU व राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत जिल्हयात राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांतर्गत तसेच जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, नागपूर करीता खालील तक्त्यांमध्ये दर्शविल्याप्रमाणे कंत्राटी तत्वावर खालील रिक्त पदांकरीता पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| Sr. No | Name of Carde/ Post | Place of Posting | Age (Upper Limit) | Total No. of Posts | Category | Essential Qualification | Essential Experience | Remuneration (In Rs.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | RBSK-Medical Officer (Male) | RH Bhiwpur-2, RH Hingna-1, RH Mouda-1, RH Parshivani-1 | 18 to 38 year for Open category, 18 to 43 years for reserved categories | 5 | ST-3, VJ-A-1, SEBC-1 | BAMS with Registration | No | Rs. 28,000/- |
| 2 | Program Manager Public Health – District Epidemiologist (IDSP) | NHM- Office (Health Dept.) Zilla Parishad, Nagpur-1 | 18 to 38 year for Open category, 18 to 43 years for reserved categories | 1 | VJ-A-1 | Any Medical Graduate with MPH/MHA/MBA in Health | No | Rs. 35,000/- |
| 3 | DEIC & NPPCD-Audiologist & Speech Therapist | DEIC Cell- Daga Women Hospital, Nagpur-1, NCD Cell- Civil Surgeon Office, Nagpur-1 | 18 to 38 year for Open category, 18 to 43 years for reserved categories | 2 | SC-1, Open-1 | Degree in Audiologist (**B.ASLP-** Bachelor in Audiology and Speech Language Pathology) | No | Rs. 25,000/- |
| 4 | NLEP, NPHCE Physiotherapist & DEIC-Occupational Therapist | DEIC Cell- Daga Women Hospital, Nagpur-1, RH Katol-1, NLEP Laprocy Office, Nagpur-1 | 18 to 38 year for Open category, 18 to 43 years for reserved categories | 3 | VJ-A-1, OBC-1, SEBC-1 | Graduate Degree in Physiotherapy (NLEP & NPHCE) Bachelor of Occupational Therapy Degree (DEIC) | 2 Year | Rs. 20,000/- |
| 5 | NTEP, IPHS - Lab Technician | District Hospital, Nagpur-1 RH Katol-1, RH Narkhed-1 | 18 to 38 year for Open category, 18 to 43 years for reserved categories | 3 | VJ-A-1, NT-D-1, SEBC-1 | B.Sc DMLT | No | Rs. 17,000/- |
| 6 | NOHP-Dental Hygienist | SDH Kampthee | 18 to 38 year for Open category, 18 to 43 years for reserved categories | 1 | VJ-A-1 | 12th +Diploma | No | Rs. 17,000/- |
| 7 | TB Supervisor-STS | THO Saoner-1 | 18 to 38 year for Open category, 18 to 43 years for reserved categories | 1 | NT-B-1, NT-C-1, OBC-1 | Any Graduate with 2 Year Experience | 2 Year | Rs. 20,000/- |
| 8 | TB Supervisor-STLS | THO Katol-1, THO Saoner-1 | 18 to 38 year for Open category, 18 to 43 years for reserved categories | 2 | | DMLT – 2 Year Experience | 2 Year | Rs. 20,000/- |

| Sr. No | Name of Carde/ Post | Place of Posting | Age (Upper Limit) | Total No. of Posts | Category | Essential Qualification | Essential Experience | Remuneration (In Rs.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | BPHU- Public Health Specialist | BPHU Katol-1, BPHU Narkhed-1, BPHU Mouda-1, BPHU Kalmeshwar-1, BPHU Parshioni-1, BPHU Kamptee-1 | 18 to 38 year for Open category, 18 to 43 years for reserved categories | 6 | ST-1, VJ-A-1, OBC-1, SEBC-1, EWS-1, Open-1 | Any Medical graduate with MPH/MHA/ MBA in Health care | No | Rs. 35,000/- |
| 10 | BPHU- Entomologist | BPHU Bhiwapur-1, BPHU Katol-1, BPHU Narkhed-1, BPHU Mouda-1, BPHU Kalmeshwar-1, BPHU Parshioni-1, BPHU Kamptee-1, BPHU Ramtek-1 | 18 to 38 year for Open category, 18 to 43 years for reserved categories | 8 | SC-1, ST-1, VJ-A-1, OBC-1, SEBC-1, EWS-1, Open-2 | M.Sc Zoology With 5 Years Experience | 5 Year | Rs. 40,000/- |
| 11 | BPHU- Lab Technician | BPHU Katol-1, BPHU Narkhed-1, BPHU Mouda-2, BPHU Kalmeshwar-2, BPHU Parshioni-2, BPHU Kamptee-2, BPHU Ramtek-1 | 18 to 38 year for Open category, 18 to 43 years for reserved categories | 11 | SC-1, NT-B-1, OBC-2, SEBC-2, EWS-2, Open-3 | B.Sc DMLT | No | Rs. 17,000/- |
| 12 | NUHM- Public Health Manager (PHM) | NUHM- Umred -1 | 18 to 38 year for Open category, 18 to 43 years for reserved categories | 1 | SC-1 | Any Medical Graduate with MPH/ MHA/MBA in Health Care | No | Rs. 32,000/- |
| 13 | NUHM- Lab Technician | NUHM- Kamptee -1, Kamptee Contonment Board -1 | 18 to 38 year for Open category, 18 to 43 years for reserved categories | 2 | SC-1, VJ-A-1 | B.Sc DMLT | No | Rs. 17,000/- |
| 14 | NUHM- Pharmacist | NUHM- Kamptee -1, Kamptee Contonment Board -1, NUHM Umred -1 | 18 to 38 year for Open category, 18 to 43 years for reserved categories | 3 | SC-1, VJ-A-1, Open-1 | 12th + D. Pharm | No | Rs. 17,000/- |
| 15 | NUHM- Staff Nurse/LHV | NUHM- Kamptee-2, Kamptee Contonment Board- 2 | 18 to 38 year for Open category, 18 to 43 years for reserved categories | 4 | VJ-A-1, OBC-1, SEBC-1 | 1) GNM 2) MNC Registration | No | Rs. 20,000/- |
| | | | **Total-** | **53** | | | | |

**अटी व शर्ती -**

सविस्तर जाहिरात हि **www.nhm.zpnagpur.in** व **www.zpnagpur.maharashtra.gov.in** वर उपलब्ध आहे. तसेच सदर जाहीरातीबाबत पात्र/अपात्र उमेदवारांची मेरीट लिस्ट व पदभरतीबाबत वारंवार प्रसिध्द होणाऱ्या सुचना हया सर्व कार्यालयाच्या **www.nhm.zpnagpur.in** व **www.zpnagpur.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात येईल.

*ऑनलाईल अर्ज सादर करण्याची अंतीम दिनांक -२४/१२/२०२५ संध्याकाळी १२.०० वाजेपर्यत.*

**सुचना :- वरील सर्व पदांकरीता www.nhm.zpnagpur.in या संकेतस्थळावर जावून उमेदवारांनी आपला दुरध्वनी क्रमांकाची नोंद करुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणे अनिवार्य राहील. कोणतेही अर्ज कार्यालयात स्विकारले जाणार नाही याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

*- संपर्ककरीता कार्यालयाचे नांव व पत्ता -*
**राष्ट्रीय आरोग्य अभियान कक्ष, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद,**
**सिव्हील लाईन, नागपूर**

टिपः- **www.nhm.zpnagpur.in** या संकेतस्थळावर अर्ज सादर करतांना उमेदवारांनी आपले मुळ दस्तऐवज स्कॅन करुनच अपलोड करणे अनिवार्य राहील तसेच ऑनलाईन अर्जामध्ये संपूर्ण माहिती अचूक भरणे अनिवार्य राहील उमेदवारांच्या निवडी पश्चात उमेदवाराने अर्जामध्ये भरलेली माहिती खोटी/चुकीची आढळून आल्यास सदर उमेदवार प्रशासकिय कार्यवाहीस पात्र राहील याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

ऑनलाईन अर्ज सादर करतांना अर्ज शुल्क मागासवीय प्रवर्गातील उमेदवारांसाठी रु. १००/- व खुल्या प्रवर्गातील उमेदवारासाठी रु. १५०/- हे ऑनलाईन पध्दतीनेच (RTGS/NEFT/Net Banking/UPI) भरणे अनिवार्य राहील.

**अटी व शर्ती**

१. वरील सर्व पदे हि **निव्वळ कंत्राटी स्वरुपाची** असुन त्यांचा कालावधी दि. २९/०६/२०२६ पर्यत राहील. हा कालावधी वाढविला जाण्याची शक्यता आहे परंतू सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही.
२. सदर पदे राज्य शासनाची नियमित पदे नसून निव्वळ कंत्राटी स्वरुपाची पदे आहेत. म्हणून अर्जदाराला शासकिय नियमित सेवेत सामावून घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्यासंबंधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.
३. अर्जदार हा संबंधीत पदासाठी शारीरीक व मानसिकदृष्टया सक्षम असावा, अर्जदाराविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.
४. ज्या कंत्राटी कर्मचाऱ्यांची नियुक्ती राज्य शासनाच्या नियमित मंजूर रिक्त पदावर करण्यात आली आहे. अशा कर्मचाऱ्यांची सेवा सदर पद रिक्त असेंपर्यत सुरु राहील. नियमित पदे भरले गेल्यास सदर कंत्राटी कर्मचाऱ्यांची सेवा आपोआप तात्काळ संपुष्ठात येईल.
५. अभियान अंतर्गत विविध स्तरावर पदभरती करण्यात येत असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती आदेशात नियुक्ती तात्पुरत्या स्वरुपात करण्यात येत असून ही नियुक्ती राष्ट्रीय आरोग्य अभियान प्रकल्प संपुष्ठात येईपर्यत या पैकी जे अगोदर घडेल तो पर्यत करण्यात येत आहे.ब
६. जिल्हा/परिमंडळ स्तरावरुन नियुक्त करण्यात येणाऱ्या व त्यांचे नियुक्ती/पुनर्नियुक्ती अधिकार जिल्हा/परिमंडळस्तरावर देण्यात आलेले आहेत. अशा कंत्राटी कर्मचाऱ्यांचे कामकाज असमाधानकारक असल्यास कारणे दाखवा नोटीस/ज्ञापण बजावण्यात येईल. संबंधितांनी विहित मुदतीत खुलासा सादर केल्या नंतर खुलासा असमाधानकारक असल्यास नैसर्गिक न्याय तत्वानुसार स्वतःचे बाजू मांडण्याची संधी देण्यात येईल. तद्नंतर असमाधानकारक कामकाजाबाबत खात्री केल्यानंतरच सेवा समाप्तीचे आदेश काढण्यात येईल. सेवा समाप्ती आदेशात त्यांच्या वर लावण्यात आलेल्या दोषारोपाचे व ते दोषारोप सिध्द होत असल्याचा सविस्तर उल्लेख करण्यात येईल.
७. कर्मचाऱ्या संदर्भात आर्थिक अनियमितता अथवा अन्य गंभीर बाबी निदर्शनास आल्यास कारणे दाखवा नोटीस/ज्ञापण बजावण्यात येईल. कर्मचाऱ्याने विहित मुदतीत खुलासा सादर केल्यानंतर खुलासा असमाधानकारक असल्यास नैसर्गिक न्याय तत्वानुसार स्वतःचे बाजू मांडण्याची संधी देण्यात येईल. अंतिमतः कर्मचारी दोषी असल्यास सेवा समाप्तीचा प्रस्ताव राज्य कार्यालयास सादर करण्यात येईल.
८. उपरोक्त सर्व पदासाठीचे वेतन हे एकत्रित मानधन आहे.
९. सदर रिक्त पदांच्या संख्येत, ठिकाण व मानधनात बदल होवू शकतो.
१०. अनुभवी व उच्च शैक्षणिक अर्हता धारकांस प्राधान्य दिले जाईल.
११. उपरोक्त पदाकरीता निवड प्रक्रिया ही राज्यस्तरावरुन प्राप्त मार्गदर्शक सुचनेनुसार घेण्यात येत असल्यामुळे जाहीरातीमधील नमूद दिनांकास विहीत कालावधीत सोबत दिलेल्या अर्ज नमुन्यात मुळ शैक्षणिक कागदपत्राच्या सत्यप्रतीसह या कार्यालयात अर्ज सादर करावा, त्यानंतर प्राप्त होणारे अर्ज स्विकारल्या जाणार नाहीत.
१२. संबंधित पदाकरीता नोंदणी नंतर पात्र, अपात्र यादी प्रसिध्द दिनांकास कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. त्यासंबंधी आक्षेप असल्यास वरील नमूद प्रमाणे कार्यालयीन वेळेत घेवून निराकरण केले जाईल त्यानंतर प्राप्त आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.
१३. अर्जदाराला सोईनुसार पदस्थापनेचे ठिकाण बदलवून मिळण्याची मागणी करता येणार नाही.

१४. उपरोक्त संबंधीत पदाकरीता तत्सम कॉन्सीलकडून रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे. अन्यथा उमेदवारांस अपात्र ठरवल्या जाईल.

१५. एकापेक्षा जास्त ठिकाणी कार्यरत असल्यास उमेदवाराने अर्ज करण्यात येवू नये. निवड उपरांत तत्सम बाब कार्यालयाच्या निदर्शनास आल्यास नियुक्ती तात्काळ रद् करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

१६. पदभरती प्रक्रियेस कार्यालयात उपस्थित उमेदवारांना प्रवासभत्ता अथवा इतर कुठलाही भत्ता देय राहणार नाही.

१७. **गुणांकन पध्दती** - वरील सर्व पदांकरीता खालील तक्त्यात नमूद गुणांकन पध्दतीनुसार निवड प्रक्रिया करण्यात येईल.

| विवरण | तपशील | अधिकतम गुण |
|---|---|---|
| पदासाठी आवश्यक (Qualifying exam मधील गुण (अंतिम वर्षाच्या गुणाच्या आधारे) | मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे ५० प्रमाणे proportion काढावे. (उदा. ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे ५०% प्रमाणे proportion =६०X५०/१००= ३०) | ५० गुण |
| पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास (संबंधित विषयामध्येच अधिकची शैक्षणिक अर्हता असल्यास विचारात घ्यावी) | अधिकतम २० गुण द्यावेत.<br>मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे २० प्रमाणे proportion काढावे. (उदा.१ Staff Nurse पदाची आवश्यक अर्हता पूर्ण करुन अतिरिक्त B.Sc (Nursing) हि शैक्षणिक अर्हता पूर्ण केलेल्या उमेदवाराने अर्ज केला असल्यास उमेदवारास B.Sc (Nursing) च्या अंतिम वर्षाचे ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे २०% प्रमाणे proportion = ६०X२०/१००= १२ गुण) | २० गुण |
| संबंधित पदाशी निगडीत अनुभव | प्रत्येक १ वर्षासाठी ६ गुण द्यावेत. (१ वर्षाकरीता ६ गुण, जास्तीत जास्त ३० गुण) | ३० गुण |
| | | **एकूण १०० गुण** |

अ) यानुसार सर्व उमेदवारांची प्रवर्गनिहाय गुणांकन यादी (Merit List) तयार करण्यात येईल.

ब) गुणांकन यादी तयार केल्यानंतर दोन किंवा त्यापेक्षा जास्त उमेदवारांना समान गुण असल्यास ज्या उमेदवाराचे वय जास्त आहे अशा उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. तसेच उमेदवाराचे गुणांकन (Merit) व वय देखील समान असेल तर अशा वेळी उमेदवाराचा संबंधित पदाशी निगडीत अनुभव जास्त असेल अशा उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

क) ज्या पदाकरीता (**उदा. ऑडीओलॉजिस्ट ॲड स्पिच थेरेपिस्ट, फिजीओथेरेपिस्ट, प्रयोगशाळा तंत्रज्ञ व स्टाफ नर्स/एल.एच.व्ही.**) Skill Assessment Protocol नुसार कौशल्य चाचणी घेणे अनिवार्य करण्यात आली आहे. त्या पदांकरीता पात्र उमेदवारांची नियुक्ती आदेश देण्यापूर्वी कौशल्य चाचणी घेण्यात येईल.

१८. <u>अनुभव करिता:-</u> जर संबधित पदाकरिता असलेल्या जाहीरातीत नमुद अनुभवी उमेदवार प्राप्त न झाल्यास खालील प्रमाणे उमेदवारांचा प्राधान्याने विचार केला जाईल.

१) त्याच राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमामधील कमी वर्षाचा अनुभव.

२) इतर राबविण्यात येणारे राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमामधील अनुभवी उमेदवार (जास्त अनुभवाला प्राधान्य)

३) अशासकिय यंत्रणेमार्फत आरोग्य कार्यक्रमामधील/उपक्रमामधील अनुभवी उमेदवार (जास्त अनुभवाला प्राधान्य)

१९. मा. सहाय्यक आयुक्त यांच्या बिंदुनामावलीप्रमाणे आरक्षणामध्ये बदल झाल्यास उमेदवारांना कोणतीही पुर्व सुचना न देता कमी करण्यात येईल.

२०. बिंदु नामावलीनुसार राखीव प्रवर्गास अनुसरुन पदभरती जाहिरात दिल्यानंतर पुढील प्रक्रियेव्दारे अपेक्षित राखीव प्रवर्गाचे उमेदवार पुरेशा प्रमाणामध्ये उपलब्ध न झाल्यास रिक्त पदाच्या भरतीची आवश्यकता लक्षात घेवून ११ महिने कालावधीसाठी प्रतिक्षा यादीतील निवड केलेल्या खुल्या प्रवर्गातील पात्र उमेदवारांना तात्पुरती नियुक्ती देण्यात येईल.

२१. शासकिय सेवानिवृत्त अधिकारी यांचेकरीता वयोमर्यादा ७० वर्ष असेल तसेच अनुभवास प्राधान्य असेल. वर्ग -३ व वर्ग-४ च्या पदावरुन निवृत्त झालेले कर्मचारी कंत्राटी पदावर अर्ज करण्यासाठी दि. १७/१२/२०१६ रोजीच्या शासननिर्णयाव्दारे अपात्र आहेत.

२२. सेवानिवृत्त उमेदवारांना मानधन शासननिर्णय क्र. संकिर्ण -२७१५/प्र.क्र./१००/१३ दि. १७/१२/२०१६ नुसार अदा करण्यात येईल. (गट क व गट ड वगळता)

२३. सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांचे विरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कार्यवाही चालु किंवा प्रस्तावित नसावी किंवा कोणत्याही प्रकारे फौजदारी प्रकरण नसावे.

**२४. वैद्यकिय अधिकारी (एम.बी.बी.एस), विशेषज्ञ आणि अतिविशिष्ठ विशेषज्ञ यांना ७० वर्ष व इतर रुग्ण सेवेशी संबंधित पदांसाठी (उदा. परिचारीका, अधिपरिचारीका, तंत्रज्ञ, समुपदेशक, औषध निर्माण अधिकारी) वयोमर्यादा ६५ वर्ष राहील.**

२५. लहान कुटुंब अट हि दि. २३/०७/२०२० पासून लागू करण्यात येत असून, दि. २३/०७/२०२० पासून दोनपेक्षा अधिक हयात मुले असणारे उमेदवार राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या कंत्राटी पदभरतीसाठी अर्ज करण्यास पात्र ठरणार नाहीत. यापुढे राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सर्व स्तरांवर कंत्राटी पदभरती करतांना लहान कुटुंबाच्या अटीचे काटेकोरपणे पालन करुन जाहिरातीमध्ये आवश्यक ती अट नमूद केली जावी. (**अधिक माहितीस्तव दि. २३/०७/२०२० रोजीचे परिपत्रक पाहावे**).

**२६.** संपूर्ण निवडप्रकिया ही गुणवत्तेवर आधारीत पारदर्शी पध्दतीने घेण्यात येईल.

**२७.** भरती प्रक्रिया स्थगिती देणे/रद् करणे/तथा एखादया पदाकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हताधारक उमेदवार उपलब्ध न झाल्यास आरोग्य सेवेची निकड लक्षात घेता सदर अर्हतेमध्ये बदल करणे/पदभरती प्रक्रियेत बदल करण्याचे सर्व अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी तथा अध्यक्ष, निवड समिती, रा.आ.अ. नागपूर यांचे स्तरावर राखीव ठेवण्यात आलेले आहेत. याबाबत कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही.

**सदस्य सचिव**
**जि.ए.आ.व कु.क.सो.**
**तथा**
**जिल्हा आरोग्य अधिकारी**
**जिल्हा परिषद, नागपूर**

**अध्यक्ष**
**जि.ए.आ.व कु.क.सो.**
**तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, नागपूर**